सकाळ

# ‘तुम्ही ऑनलाइन आहात... कुणीतरी पाहतंय’

## सतर्क राहा, सुरक्षित राहाः ‘सकाळ’ संवादमध्ये ‘सायबर वॉरियर्स’चा सल्ला

■ सकाळ वृत्तसेवा

**अकोला,ता. ८: ‘जग डिजिटल होतंय... धोकेही वाढत आहेत!’ आपण ऑनलाईन असताना, कुणीतरी आपल्याला पाहतंय. ही जाणीव कायम ठेवणं आजच्या काळात अत्यावश्यक बनलं आहे. सायबर गुन्ह्यांचं प्रमाण झपाट्याने वाढत असून, अगदी सामान्य मोबाईल वापरकर्त्यांपासून ते उच्चशिक्षित व्यक्तींपर्यंत अनेकजण याचा बळी पडत आहेत. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने ‘सतर्क राहा, सुरक्षित राहा’ हा मंत्र अंगीकारण्याची गरज आहे, असा स्पष्ट इशारा ‘सकाळ संवाद’ या विशेष जनजागृती परिसंवादात ‘सायबर वॉरियर्स’नी दिला.**



अकोलाः ‘सकाळ संवाद’मध्ये सायबर सुरक्षा जागरुकता कार्यक्रमाची माहिती देताना अकोला सायबर वॉरियर्स क्लबचे अध्यक्ष रोहन सर्जेकर, सचिव प्रणाली पिंपळकर, सदस्य तथा माध्यम समन्वयक अनिकेत फुके व ॲक्टिव्हीटी डायरेक्टर पूर्वा ताथे.

शंकरलाल खंडेलवाल कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, अकोला (एमएस) यांच्या वतीने क्विक हिल फाउंडेशन पुणे व महाराष्ट्र सायबर यांच्या संयुक्त सहकार्याने ‘सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम’ राबवला जात आहे. ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’

या घोषवाक्याने सायबर गुन्ह्यांविरोधात सावधतेचा संदेश या माध्यमातून देऊन विद्यार्थी, युवक, युवती, ज्येष्ठ नागरिकांना सतर्क राहा, सुरक्षित राहण्याचे आवाहन केले जात आहे. सायबर सुरक्षेसंबंधी विविध मुद्द्यांवर प्रात्यक्षिके, चर्चासत्रे व मार्गदर्शन करण्यात येत आहे. सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, त्याचा बळी पडणाऱ्यांमध्ये




युवक आणि शेतकरी वर्गाही मोठ्या संख्येने आहे. हे प्रकार थांबवण्यासाठी शंकरलाल खंडेलवाल कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे सायबर वॉरियर्स क्लब स्थापन करण्यात आला आहे. याच क्लबच्या सदस्यांसोबत साधलेला ‘संवाद’.

❝ केवळ अकोला जिल्ह्यातच नव्हेतर महाराष्ट्रातील ३० महाविद्यालयांमधील विद्यार्थी या उपक्रमाअंतर्गत सायबरबाबत जनजागृती करीत आहेत. केवळ राज्यातच नव्हेतर गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक आदी राज्यातही हा उपक्रम राबवला जात आहे. शहरातील धार्मिक स्थळे, विविध शाळांमध्ये विद्यार्थी व पालकांमध्ये या विषयाबाबत जागृती केली आहे. सायबर सेफ फॉर लिटल चॅम्प ही चिमुकल्यांसाठी तर पालकांसाठी पॅरेंट्स ॲज वॉरियर्स हा विशेष उपक्रम राबवण्यात आला. यासाठी प्रा.डॉ. हरिदास खरात यांचे विशेष सहकार्य लाभले. या माध्यमातून आम्ही डिजिटल सुरक्षेचे धडे दिले. जास्तीत जास्त शाळा, महविद्यालयासह लाखो जनतेपर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न आहे.

- **रोहन सर्जेकर**, अध्यक्ष, सायबर वॉरियर्स क्लब.

### सायबर गुन्हा घडल्यास त्वरित खालील ठिकाणी संपर्क साधावाः -

- सायबर क्राईम हेल्पलाइन - 1930
- सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल - https://cybercrime.gov.in
- महाराष्ट्र सायबर अँटी फिशिंग युनिट - https://www.reportphishing.in
- बॉटनेट क्लीनिंग अँड मालवेअर विश्लेषण - https://www.cyberswachhtakendra.gov.in



### याकडे द्या लक्ष ...

- अनोळखी कॉल्स, एसएमएस व व्हिडिओ कॉल्स उचलू नका.
- फेक लॉटरी ॲप्स आणि ऑनलाईन गेम्सपासून दूर राहा, यामुळे बँक खाते लॉक होण्याची शक्यता.
- बँकेसंबंधी माहिती, ओटीपी, पिन, सीव्हीव्ही कुणालाही सांगू नका. कोणतीही बँक ही माहिती मागत नाही.



- फेक वेबसाइट्स ओळखण्यासाठी '.gov.in' किंवा '.nic.in' या अधिकृत डोमेनवर भर द्या.
- सोशल मीडियावर अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारताना दक्षता बाळगा.
- ई-मेल स्पॅम फिल्टर सक्रिय ठेवा, संशयास्पद लिंकवर क्लिक करू नका.
- बँकिंग व्यवहारानंतर "https" असलेली वेबसाईट तपासा आणि ब्राउझिंग हिस्ट्री क्लिअर करा.
- शेतकरी बांधवांनी अधिकृत पोर्टल किंवा ॲपद्वारे विमा भरावा. फेक एजंटपासून सावध राहा.
- बँक डिटेल्स किंवा ओटीपी कुणालाही देऊ नका. बोगस कॉल्सवर विश्वास ठेवू नका.

❝ विद्यार्थी, नागरिकांना ट्रेनिंग देण्याआधी आमचे क्वीक हिल कंपनीकडून ट्रेनिंग झाले आहे. क्विकहिलच्या चेअरपर्सन अनुपमा काटकर ह्या स्वतः या विषयाकडे गांभिर्याने लक्ष ठेवून आहेत. वेळोवेळी पोलिस विभागामार्फत सुद्धा आम्हाला मार्गदर्शन मिळत राहते. अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवून डिजिटल सुरक्षा पाळण्यासाठी जनतेला सजग करणे आमचे ध्येय आहे.

- **अनिकेत फुके**, सदस्य, तथा माध्यम समन्वयक, सायबर वॉरियर्स क्लब.

❝ या उपक्रमाअंतर्गत आतापर्यंत अमरावती, अकोला व वाशीम जिल्ह्यात ३० पेक्षा अधिक प्रेझेन्टेशन दिले आहेत. शेगाव गजानन महाराज मंदिर, मातृमंदिर अकोला मध्ये जन्माष्टमी, पीकेव्ही कृषी प्रदर्शनीत विशेष कार्यक्रम याबाबत घेतला होता. जवळपास ३० हजार नागरिक व ७0 हजार विद्यार्थी यांना ५00 कार्यशाळेच्या माध्यमातून जागृत केले आहे. यासाठी आम्हाला शिक्षण प्रसारक मंडळ अकोलाच्या अध्यक्षा श्रीमती ताराताई हातवळणे व सचिव गोपाल खंडेलवाल यांच्यासह प्राचार्य डॉ. जगदीश साबू व डॉ. दीप्ती पेठकर यांचे मार्गदर्शन व पाठींबा वेळोवेळी लाभतो.

- **प्रणाली पिंपळकर**, सचिव, सायबर वॉरियर्स क्लब.

❝ विद्यार्थी दशेत आम्हाला या महत्वाच्या विषयाबाबत जागृती करण्याचे भाग्य लाभले त्यासाठी नशिबवान समजतो. उपक्रमात जुळण्याआधी पुण्यात ट्रेनिंग पुर्ण केले. आतापर्यंत डॉक्टर्स डे, पोस्टल वर्क्स डे, स्पोर्ट्स जर्नालिस्ट डे, विठ्ठल एकादशी आदी सण उत्सवाप्रसंगी सार्वजनिक व धार्मीक स्थळी सायबर सुरक्षेबाबत जागृती मोहिमेत सहभाग घेतला. जास्तीत जास्त युवती व महिलांपर्यंत पोहचण्याचा आमचा मानस आहे.

- **पूर्वा ताथे**, ॲक्टिव्हीटी डायरेक्टर, सायबर वॉरियर्स क्लब.